सामना पान क्र.5

# सायबर चिटरने दोन लाख हडपले; वडील रागावतील या भीतीने मुलाची आत्महत्या

वसई, दि. ६ (सा.वा.) - आईच्या मोबाईलमध्ये खेळत असताना चुकून एक लिंक ओपन झाली आणि सायबर भामट्याने दोन लाख रुपये हडप केले. हा प्रकार समजल्यानंतर वडील रागावतील या भीतीने एका १८ वर्षीय तरुणाने कीटकनाशक पिऊन आत्महत्या केली. ही घटना नालासोपारा येथील धानिवबागमध्ये घडली.

नालासोपारा पूर्वच्या धानिवबाग येथील ओम जीडीएस कॉलनीत राहणारे अविनाश रॉय (४०) यांचा मोठा मुलगा गौरव (१८) हा सुट्टी लागल्याने आईच्या मोबाईलमध्ये गेम खेळत होता. बुधवारी त्याच्या मोबाईलवर एक लिंक आली. चुकून त्याने ती लिंक ओपन केली. मात्र ती फसवी लिंक सायबर भामट्याने पाठवली होती. लिंक ओपन केल्यामुळे सायबर भामट्याने गौरवचा मोबाईल हॅक करून दोन लाख रुपये हडप केले. या प्रकारामुळे गौरव खूप घाबरून त्याने आत्महत्या केली.

## दोन लाचखोर विमा कर्मचाऱ्यांवर झडप

ठाणे - ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना विमा निगमच्या दोन कर्मचाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडले आहे. अटक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये सहाय्यक निर्देशक अधिकारी धीरेंद्र मिश्रा आणि सामाजिक सुरक्षा अधिकारी रवीकुमार तेलवडे यांचा समावेश आहे. कार वॉशिंगचा व्यवसाय करणाऱ्या एका व्यावसायिकाने आपला व्यवसाय बंद असल्याबाबत राज्य विमा निगमच्या ठाणे कार्यालयाला कळवले नव्हते. त्यांनी कर्मचाऱ्यांचा विमा न भरल्याने त्यांच्याकडे लाचेची मागणी करण्यात आली होती.

(पुण्यनगरी पु. पान क्र. 6

# वज्रेश्वरी–शिरसाड मार्गावर अवजड वाहनामुळे ‘कोंडी’

**। नालासोपारा :** वज्रेश्वरी -शिरसाड मार्गावर घाटेघर येथे मशीन घेऊन जाणारे अवजड वाहन मार्गातच अडकल्याने दोन दिवसांपासून या ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे.या ठिकाणी प्रवाशांना सुमारे दोन तास वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत असल्याने प्रवासी हैराण होत आहेत. या ठिकाणी पुलाचे काम सुरू असल्याने वाहतूक शेतातून वळवण्यात आली आहे.

अवजड वाहन शेतातून जात असताना अडकून पडल्याने ही वाहतूक कोंडी झाल्याचे मांडवी पोलिसांनी सांगितले.वज्रेश्वरी -शिरसाड मार्गावर दररोज हजारो वाहने ये-जा करतात.वाहनांची वाढती वर्दळ पाहता सार्वजनिक बांधकाम विभागाने या मार्गावरील पुलांची कामे हाती घेतली आहेत. कारखान्यांसाठी मशीन घेऊन जाणारे हे अवजड वाहन अंबाडीवरून शिरसाड येथे जाण्यासाठी काही दिवस अगोदर या मार्गाची पाहणी करून मार्गावर असणाऱ्या झाडांची मोठया प्रमाणात कत्तल करण्यात आली आहे.यात जुने वटवृक्षही तोडण्यात आले.त्यामुळे आपले वाहन जावे यासाठी निसर्गाची हानी केल्याने या वाहन चालकावर कारवाई करावी,अशी मागणी या भागातील नागरिक करत आहेत. घाटेघर येथेही पुलाचे काम सुरू केले आहे.

(पुढारी पान क्र. 8

# उभ्या कंटेनरला ट्रकची धडक, एक गंभीर जखमी

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई अहमदाबाद महामार्गावर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कंटेनरला पाठीमागून एका ट्रकने जोरदार धडक दिल्याने अपघाताची घटना शनिवारी पहाटे घडली.या अपघातात एकजण गंभीर जखमी झाला आहे.



मुंबई अहमदाबाद महामार्गावर एक कंटेनर हा चिंचोटी महामार्ग वाहतूक पोलीस शाखेच्या हद्दीतील गुजरात वाहिनीवरील अलीफ ढाबा येथे रस्त्याच्या कडेला उभा होता . यावेळी शनिवारी पहाटेच्या वेळेस पाठीमागून येणाऱ्या ट्रकने कंटेनरला जोरदार धडक दिली.

या अपघातात ट्रक मधील क्लीन-रला गंभीर दुखापत झाली आहे. पहाटेच्या सुमारास घडलेल्या या अपघाताची माहिती चिंचोटी वाहतूक पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. अपघातात जखमी व्यक्तीला रुग्णालयात दाखल केले आहे. पोलिसांनी अपघात ग्रस्त दोन्ही वाहने रस्त्याच्या बाजुला करून महामार्गा वरील बराचवेळ अडकलेली वाहतूक सुरळीत करण्यात आली.

CS CamScanner

पुण्यनगरी पु. पान क्र. 1

# खदानीत सापडलेल्या मृतदेहाचे गूढ उकलले

**। नालासोपारा :** पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीत धानीव खदानीत सापडलेल्या मृतदेहाचे गूढ उकलण्यात पेल्हार पोलीसांना यश आले असून हा खून पैशासाठी मित्राने केल्याचे समोर आले. याप्रकरणी एका तरुणाला अटक केली आहे. पेल्हार पोलीस ठाणे हद्दीतील धानिव पांढरीपाडा येथे खोल दगडाच्या खदानीत एकजण पडून मृत्यू झाल्याची माहिती १७ जानेवारीला पोलीसांना मिळाली होती.

चौकशीअंती हा मृतदेह ब्रिजेश कामताप्रसाद चौरासिया (४१) जाबर पाडा, पेल्हार यांचे असल्याचे पोलीस तपासात उघड झाले. त्यानंतर ब्रिजेश यांची बहिण सारिका यांनी त्यांची हत्या झाल्याचा संशय व्यक्त केला होता. त्यानुसार या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोपान पाटील यांनी सारिका यांच्याकडे चौकशी केली. असता गुन्हे शाखेने बलराम ला विश्वासात घेऊन चौकशी केली असता, त्याने ब्रिजेश चौरसिया कडून ५५ हजार रुपये घेतले होते. त्यापैकी २२ हजार रुपये परत दिले असतानाही ब्रिजेशने बलराम ला आदल्या रात्री जाबरपाडा येथील राहत्या गाळयात डांबून ठेवले होते. त्यावेळी त्याच्याकडुन १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर ३ लाख रुपये घेतल्याचे लिहून घेऊन रात्रभर डांबून शिवीगाळ आणि दमदाटी केली होती.

पुण्यनगरी पु. पान क्र. 1

# नालासोपाऱ्यात रिक्षाचालकांची दादागिरी

**। नालासोपारा :** नालासोपारा पश्चिमेकडील रोटी हॉटेलसमोरील रिक्षा चालकांनी मुख्य रस्त्याची वाट अडवून दादागिरी करत असून या दादागिरीला पोलिसांची सुद्धा साथ असल्याचा आरोप होत आहे.पोलिसांच्या साथीने केलेल्या या दादागिरीचा फटका अत्यावश्यक वाहनांना बसत आहे.

पश्चिमेकडील रेल्वे स्थानकालगत महापालिकेचे विभागीय कार्यालय, महावितरण कार्यालय, करविभाग, टेलीफोन एक्सेंज अशी महत्वाची कार्यालये आणि शाळा, सभागृहे आहेत. या ठिकाणी जाण्यासाठी उड्डाण पुलाखालील मुख्य रस्त्याचा वापर करावा लागतो. मात्र, या एकमेव रस्त्याचा ताबा रिक्षाचालकांनी घेतला आहे. प्रवाशी उतरवल्यानंतर रांगेत रिक्षा न लावता रिक्षाचालक भर रस्त्यात प्रवाशांची वाट पाहत घुटमळत असतात. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होत असते. तिन ते चार प्रवाशी भरल्यानंतरच हे रिक्षाचालक वाट मोकळी करुन देत असल्यामुळे अनेक वाहने अडकून पडत आहेत.



रुग्णवाहिका, शववाहिनी, अग्निशमन दलाचे बंब, शाळेच्या बसेस, शासकीय अधिकाऱ्यांच्या गाड्यांनाही हे रिक्षाचालक वाट देत नाहीत. तसेच काही रिक्षाचालक रेल्वेस्थानकाडून येणाऱ्या वाटेवर रिक्षा उभ्या करत असल्यामुळे प्रवाशांना मार्गक्रमण करताना अपघाताला सामोरे जावे लागत आहेत.

लोकमत पृ. पान क्र. 1

## तरुणाचा बुडून मृत्यू



**मनोर :** दूर्वेस येथील वैतरणा नदीत अंघोळीसाठी गेलेल्या तरुणाचा पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी घडली आहे. चेतक उर्फ नंदू उपाध्याय (वय ३५) असे मृत तरुणाचे नाव असून तो ढाकव्हाल येथे पत्नीसोबत राहत होता. याप्रकरणी मनोर पोलिस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आले. तरुणाच्या मृत्यूमुळे पत्नीसह कुटुंबीयांचा आधार हरपल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

## मारहाण करून मजुराला लुटले

**मीरारोड :** भाईंदर पूर्वेच्या जय अंबे नगर चाळमध्ये राहणारा मोखई रामप्रसाद निषाद (४५) हा मजूर नवघर फाटक रोडवर चर्चजवळील बस स्टॉप येथून जात होता. त्यावेळी दोन अनोळखी व्यक्तींनी त्याला मारहाण करून जबरदस्तीने त्याच्या खिशातील ४० हजार रुपयांची रोकड लुटून नेली. नवघर पोलिसांनी याप्रकरणी ३ एप्रिल रोजी रात्री गुन्हा दाखल केला आहे. यातील गौरव संभाजी सूर्यवंशी (२३, रा. ओस्तवाल टॉवर, भाईंदर पूर्व) ह्याला पोलिसांनी अटक केली आहे. स.पो.निरीक्षक संदीप पालवे तपास करीत आहेत.

## शेजारणीने चोरले हजारोंचे दागिने




**मीरा रोड :** मीरा रोड स्टेशन जवळील हर्ष विहार सोसायटीतील कमलेश विनोद ठाकूर यांच्या घरातून सोन्याचे मंगळसूत्र, साखळी, पेंडल, कानातले आणि अंगठी असे ५८ हजार रुपये किमतीचे दागिने शेजारीच राहणाऱ्या दीपमाला मौर्या या महिलेने चोरले. कमलेश यांच्या फिर्यादीवरून त्यांच्या संमतीशिवाय लबाडीने घरातून दागिने चोरून नेल्याप्रकरणी नया नगर पोलिसांनी दीपमालावर गुन्हा दाखल केला आहे. पोलिस निरीक्षक इरफान नदाफ तपास करत आहेत.

लोकमत पृ. पान क्र. 4

## कार्ड चोरून ४ लाख लंपास

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** बॅग चोरून चोरट्याने डेबिट कार्ड व क्रेडिट कार्डद्वारे एकूण ४ लाख ४ हजार रुपये लंपास केल्याचा प्रकार समोर आला आहे. भाईंदर पूर्वेच्या न्यू गोल्डन नेस्ट येथील इंद्रप्रस्थ मधील अमित हरनारायण अग्रवाल यांचा कुरियरचा व्यवसाय आहे. त्यांची बॅग लबाडीने चोरट्याने चोरून नेली. त्यातील डेबिट कार्डद्वारे ३९ हजार, तर क्रेडिट कार्डद्वारे ३ लाख ६५ हजार रुपये असे एकूण ४ लाख ४ हजार रुपयेही चोरट्याने काढून घेतले. याप्रकरणी अग्रवाल यांच्या फिर्यादीवरून भाईंदर पोलिसांनी 3 एप्रिलला गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपनिरीक्षक प्रसाद गोवले तपास करीत आहेत.

CS CamScanner

लोकमत पृ. पान क्र. 1

# ...तर माझ्यावर पहिला गुन्हा दाखल करा

## विवेक पंडित : उर्वरित ग्रामपंचायतींवरही आंदोलन करणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**विक्रमगड** : 'जिल्हा प्रशासन नागरिकांना पाण्याचा अधिकार देण्याची आपली जबाबदारी पार न पाडता आंदोलन करणाऱ्या सामान्य महिलां कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्याची जर भूमिका घेत असेल, तर पहिला गुन्हा माझ्यावर दाखल करा', असे आव्हान श्रमजीवीचे संस्थापक विवेक पंडित यांनी शनिवारी विक्रमगडमधील शिळ येथे केले. ठेकेदारांनी अंदाजपत्रकाप्रमाणे आणि मुदतीत काम न केल्याने नागरिकांचा पाण्याचा हक्क हिरावून घेतला जात आहे. या हक्काबाबत आवाज उठवणे, अधिकार मागणे हा जर गुन्हा ठरत असेल, तर हा गुन्हा करणारा पहिला मी आहे, असेही विवेक पंडित यावेळी म्हणाले.

पाणी प्रश्नाबाबत विक्रमगड येथे शनिवारी महिला मेळावा झाला. यावेळी विवेक पंडित यांनी महिलांशी संवाद साधला. 'एक हातात रिकामा हंडा आणि दुसऱ्या हातात तीन फुटी दांडा' हा मंत्र सध्या लक्षवेधी ठरत असून, हा दांडा म्हणजेच आपला पाण्याचा अधिकार घेण्यासाठी असलेला 'राजदंड' आहे. तो राजदंड मी महिलांच्या हातात दिला आहे,' असे पंडित यांनी यावेळी सांगितले.

घरोघरी पाणी मिळाले पाहिजे, यासाठी केंद्राकडून मोठ्या प्रमाणात जलजीवन मिशनसाठी निधी देण्यात आलेला आहे. या निधीचा योग्य वापर करून घेण्याची जबाबदारी आपली आहे. सरपंच, सदस्य यांनी लक्ष देऊन ही योजना व्यवस्थित अंमलात आणली पाहिजे, असे पंडीत म्हणाले.



### हे काम प्रत्येकाने करावे'

पाइपलाइन ही जमिनीच्या आत तीन फुटांपर्यंत खोलवर टाकलेली आहे का? हे तपासण्याचे काम प्रत्येकाने करायचे आहे, यासाठी दांड्याचा आपण वापर करणार आहोत, असेही पंडित म्हणाले. तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींवर 'श्रमजीवी'ने हंडा मोर्चा काढला, तर उर्वरित ग्रामपंचायतींवरही अशाच प्रकारचे आंदोलन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

लोकमत पृ. पान क्र. 3

# अमली पदार्थ पुरविणाऱ्या तरुणास गुजरातमधून अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड** : भाईंदरच्या भोलानगर भागातील विक्रेत्यास अमली पदार्थ पुरविणाऱ्या मोहसीन यासिन खान (वय ३२, रा. गल्ली क्रमांक १०, भोलानगर झोपडपट्टी, भाईंदर) याला भाईंदर पोलिसांनी गुजरातच्या वलसाड येथून अटक केली आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी पथकाचे पोलिस निरीक्षक अमर मराठे व त्यांच्या पथकाने भाईंदरच्या भोलानगर झोपडपट्टीजवळ भाईंदर-उत्तम रस्त्यावरून राकेश साचूलाल सरोज (२३, रा. भाईंदर) याला अमली पदार्थ हेरॉईनसह अटक केली होती. त्याच्याकडून ३ लाख ७५ हजारांच्या हेरॉईनसह २१ हजारांचा मोबाइल आणि ३ हजार ७०० रुपयांची रोख रक्कम जप्त केली होती. हेरॉईन हा अमली पदार्थ त्याला मोहसीन याने विक्रीसाठी दिला होता व त्याला १ हजार रुपये मोहसीन देत होता, असे त्याने चौकशीत सांगितले होते.



### गुप्त बातमीदार, तांत्रिक तपासाद्वारे कारवाई

- भाईंदर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सूर्यकांत नाईकवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरणचे सहायक पोलिस निरीक्षक माणिक कथुरे, हवालदार राजेश श्रीवास्तव, रवींद्र भालेराव, सलमान पटवे यांच्या पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक तपास करीत मोहसीन याला गुजरातमधून अटक केली.
- मोहसीन हा पोलिसांना हुलकावण्या देत होता. त्याच्या भाईंदर येथील घरी तो राहत नसल्याचे आढळून आले होते. मोहसीन हा सध्या कोठडीत असून, उपनिरीक्षक अनिल करे तपास करीत आहेत.

# वडिलांकडे तक्रार; भावावर चाकूने वार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड** : वडिलांकडे तक्रार केल्याच्या रागातून भावाने भावावर चाकूने वार केल्याची घटना समोर आली आहे. भाईंदर पूर्वेच्या गोडदेव नाका येथील अयोध्या निवासमधील शिवकिसन बालकिसन सरोज (वय ३०) याने त्याच्या वडिलांना भाऊ अमितकुमार याच्याबद्दल तक्रार केली. अमित रात्रभर बाहेर फिरत असल्याने त्याला गावी घेऊन जा, असे त्याने वडिलांना सांगितले. याच्या रागातून अमित कुमार याने घरातील चाकू भाऊ शिवकिसन याच्या डोक्यात मारला. याप्रकरणी शिवकिसन याच्या फिर्यादीवरून नवघर पोलिस ठाण्यात अमितकुमारवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार लक्ष्मण शिंदे तपास करत आहेत.